**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ३९/२०१३ मधील नि. ४१ वरील आदेश</u>**

प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्याविरुध्द जो विना कैफियत आदेश झालेला आहे तो रद्द करुन मिळण्यासाठी सदरचा अर्ज आहे. त्यांचे असे कथन आहे की त्यांना मुदतीत कागदपत्र सापडले नाहीत. तसेच सदर दोन्ही पक्षकार पती— पत्नी असून ते मुंबई येथे असतात. प्रतिवादी क्र. ४ हिला हृदयविकाराचा सौम्य झटका आला होता. त्यामुळे ते वकिलांशी वेळीच संपर्क साधू शकले नाहीत. त्यामुळे कैफियत देवू शकले नाहीत. सबब त्यांनी अर्ज मंजूर करुन त्यांची कैफियत दाखल करुन घ्यावी अशी विनंती केली आहे.

०२. सदरच्या अर्जास वादीतर्फे म्हणणे देण्यात आले आहे. त्यांचे असे कथन आहे की अर्ज खूप विलंबाने देण्यात आलेला आहे. अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच अर्जात नमूद कारण खोडसाळ आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ८ नियम १ मधील तरतूद ही मार्गदर्शक स्वरुपाची आहे. पक्षकारांना न्यायाच्या हेतूने कैफियत देण्यासाठी संधी देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांच्यावर अन्याय होईल. सबब अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेवून प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी वादीला रक्कम रु. ५००/— खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे. त्याच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करण्यात येत आहे.

सही/—

मालवण, ( संतोष द. चव्हाण)

दिनांक : १५/१०/२०१५ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण.